# Maharashtra Board Class 10 Sanskrit Anand Solutions Chapter 6 संस्कृतनाट्यस्तबकः

1. माध्यमभाषया उत्तरत । शक्रस्य कपटं विशदीकुरुत।

प्रश्न 1.
शक्रस्य कपटं विशदीकुरुत।
उत्तरम् :
'कर्णभारम्' ही आद्य नाटककार भासाने लिहिलेली, महाभारतावर आधारित एकांकी शोकांतिका आहे. भासाने रंगविलेल्या शक्र व कर्णाचा संवाद, कांच्या उदारतेला सर्वोच्च दर्जा प्राप्त करुन देतो.

इंद्रदेव, शक्राच्या रूपात, एक याचक बनून कर्णाकडे सर्वाधिक भिक्षेची याचना करतो, कर्णाने दिलेली, हजार गायी, असीमित सोने, जिंकलेली पृथ्वी, कर्णाचे शिर ही सर्व दाने इंद्र नाकारतो. अखेर, कर्णाच्या प्राणांचे संरक्षक, कवचकुंडलांच्या दानाबद्दल बोलताच, शक्र लगेच ते मान्य करतो.

शक्राला कवच आणि कुंडलांचीच इच्छा असते. कारण या कवचकुंडलांच्या कृपेने कर्ण अमर होता. शिवाय त्यामुळे कर्णाकडून युध्दात अर्जुन मारला गेला असता. शक्राला इंद्राचा उदार स्वभाव माहीत होता. म्हणून जोवर कपनि कवचकुंडलांचे दान देण्याचे सांगितले नाही, तोवर शक्र सर्व दाने नाकारून सर्वोत्तम दानाची विनवणी करत राहिला. श्रीकृष्णाने आखलेल्या या योजनेत शक्राने दानशूर कर्णाला कपटाने शब्दबध्द केले व अखेर कर्णान देवी कवचकुंडलांचा त्याग केता.